# <u>प्रेस नोट</u>

ला.प्र.वि,वाशिम.

दि.२८/०८/२०२५

**आलोसे** प्रविण गजानन मुठाळ, वय ३० वर्षे, पद– वरिष्ठ तंत्रज्ञ, कार्यालय– वाशिम शहर भाग–०१, सिव्हील लाईन,३३/११ के.व्ही. सबस्टेशन एम.एस.ई.बी.कार्यालय वाशिम, रा.सुंदर वाटीका, वाशिम यांना लाच स्विकारले प्रकरणात ताब्यात घेउन गुन्हा दाखल करण्याची प्रक्रीया सुरु आहे.

| | |
|---|---|
| आरोपी नांव हुद्दा व पत्ता | **आलोसे** प्रविण गजानन मुठाळ, वय ३० वर्षे, पद– वरिष्ठ तंत्रज्ञ, कार्यालय– वाशिम शहर भाग–०१, सिव्हील लाईन,३३/११ के.व्ही. सबस्टेशन एम.एस.ई.बी.कार्यालय वाशिम, रा.सुंदर वाटीका, वाशिम |
| लाच मागणी रक्कम | ४०००/– रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | तक्रारदार यांचे ग्राहक श्री. लहाने रा.सिव्हील लाईन वाशिम यांचे घराचे कनेक्शन सिंगल फेज वरुन थ्री फेज विद्युत जोडणी करण्याकरीता ४०००/– रुपयांची लाच मागणी केली. |
| सापळा अधिकारी | जगदीश परदेशी, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,वाशिम. |

दि.०८/०८/२०२५ रोजी तक्रारदार पुरुष वय ३४ वर्ष यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे ग्राहक श्री. लहाने रा.सिव्हील लाईन वाशिम यांचे घराचे कनेक्शन सिंगल फेज वरुन थ्री फेज विद्युत जोडणी करण्याकरीता लाईनमन प्रविण मुठाळ हे ५०००/– रुपये लाचेची मागणी करत आहेत.

दि.०८/०८/२०२५ रोजी पडताळणी कारवाई दरम्यान लाईनमन प्रविण मुठाळ यांनी तक्रारदार यांना ४०००/– रुपयाची लाचेची मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शविल्याचे निष्पन्न झाले.

दि.०९/०८/२०२५, दि.२०/०८/२०२५, दि.२५/०८/२०२५ रोजी सापळा स्थगीती/सापळा कारवाई दरम्यान **आलोसे** प्रविण गजानन मुठाळ, वय ३० वर्षे, पद– वरिष्ठ तंत्रज्ञ, कार्यालय– वाशिम शहर भाग–०१, सिव्हील लाईन,३३/११ के.व्ही. सबस्टेशन एम.एस.ई.बी.कार्यालय वाशिम यांना तक्रादार यांचेवर संशय आल्याने त्यांना भेटण्याचे टाळुन लाच रक्कम स्विकारली नाही. तक्रारदार यांचे फिर्यादवरुन आलोसे प्रविण मुठाळ यांचे विरुध्द पो.स्टे.वाशिम शहर येथे भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनीयम १९८८ चे कलम ७ प्रमाणे गुन्हा दाखल करण्याची कारवाई सुरु आहे.

सदर कार्यवाही मा.पोलीस अधिक्षक, श्री मारुती जगताप, अपर पोलीस अधिक्षक, श्री सचिंद्र शिंदे, ला.प्र.वि. अमरावती, यांचे मार्गदर्शनात पोलीस उपअधिक्षक, जगदीश परदेशी, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वाशिम यांचे पथकातील कर्मचारी पोहवा विनोद मारकंडे, नितीन टवलारकर, ,योगेश खोटे, राहुल व्यवहारे, विनोद अवगळे ला.प्र.वि.वाशिम यांनी केली.

शासकिय लोकसेवकाने,खाजगी इसमाने शासकिय काम करुन देण्यासाठी व करण्यासाठी लाचेची मागणी केल्यास त्याबाबत अॅन्टी करप्शन ब्युरो,वाशिम दुरध्वनी क्रमांक ०७२५२/२३५९३३ टोल फ्रि.नं.१०६४ मोबाईल क्रमांक – ७५०७०५५२०५ यावर संपर्क साधण्याचे आवाहन जगदीश परदेशी, पोलीस उपअधिक्षक अॅन्टी करप्शन ब्युरो, वाशिम यांनी केले आहे.

(जगदीश परदेशी)
**पोलीस उपअधिक्षक, ला.प्र.वि.,वाशिम.**